==========================================================================

# एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कादंबरीचे बदलते स्वरूप
## (२००१-२०१०)

डॉ.मधुकर नंदनवार
मराठी विभागप्रमुख
भिवापूर महाविद्यालय भिवापूरजि.नागपूर
Mo.No.9423634015
e-mail-madhukarnandanwar0@gmail.com

==========================================================================

**सारांश:**

मार्क्सवाद,गांधीवाद,आंबेडकरवाद या मानाने 'स्त्रीवाद' ही विचारसरणी अद्ययावत,आधुनिक आहे.स्त्रीवाद ही नवी विचारसरणी १९७५ च्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने उदयास आली.ती उत्तरोत्तर एवढी प्रभावशाली बनत गेली की,ती एक सर्वांगीण,सर्वंकष विचारसरणी बनली.आजच्या स्त्री- पुरुष समानतेच्या या काळात तिचे अस्तित्व,मोठेपण,वेगळेपण,सामर्थ्य सर्वांना मान्य करण्याखेरीज पर्यायच उरला नाही.स्त्रीवादी विचारसरणीमुळे तत्कालीन समाजव्यवस्थेतील पुरुषप्रधानता,स्त्रियांवर पिढ्यानपिढ्या जबरदस्तीने लादलेले दुय्यमत्व,स्त्री-पुरुष संबंध,लिंग-भेदभाव अशा कितीतरी अनेक नव्या संकल्पना या विचारसरणीमुळे उघडकीस,उदयास आल्या.मानवी ज्ञान,कला,साहित्य व जीवनाकडे पाहण्याची एक नवी समीक्षक दृष्टी समाजात रुजत- मुरत गेली.पुढे स्त्रियांनी साहित्यलेखन करत असतांना त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम त्यांच्या लेखनावर पडू लागला.लेखनाचे स्वरूप व विषय बदलू लागले. कुटुंबाच्या,समाजाच्या पारंपरिक चौकटी ओलांडून स्वतःच स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याचा ती जाणीवपूर्वक कसोशीने प्रयत्न करू लागली. हा प्रयत्न पारंपरिक समाजाचे वर्चस्व,अपेक्षा यांना झुगारून मोठा धक्का देणारा होता.स्त्री जीवनात अचानक आलेली संकटे परिस्थिती,संघर्ष,परिणाम यावर मात करून पुढे जाण्याची तळमळ यातून दिसून येते.स्त्रियांच्या लिखाणातून स्त्रियांच्या प्रतिमाचे स्वरूप स्त्रीदेहाच्या वर्णनापेक्षा तिला अकस्मात आलेल्या परिस्थितीवर केलेला संघर्ष व त्यावर तिने केलेली मात असे नवे विषय येऊ लागले.स्त्री ही पुरुषाच्या उपभोगाचे साधन आहे अशी पारंपरिक विचारसरणी बदलत जाऊन स्त्रीच्या स्त्रीत्वाला प्राधान्य मिळू लागले.स्त्रियांच्या रोमँटिक संकल्पना बदलत जाऊन 'स्त्री' ही सुद्धा एक मानवी मन असलेला देह आहे, तिलासुद्धा विचार,भावना,मन आहे अशा परिवर्तनवादी संकल्पनांना तोंड फुटून त्या नव्या तेजाने पुढे येऊ लागल्यात.काही स्त्रियांच्या कादंबरी लेखनातून प्रत्यक्षपणे तर काही स्त्रियांच्या कादंबरी लेखनातून अप्रत्यक्षपणे बदल झालेले दिसून येतात.

**बीज शब्द:** स्त्रीवादी, शतकातील,कादंबरी,वेगळेपण,जीवनइत्यादी.

**प्रस्तावना:**

मानवाच्या नैसर्गिक अवस्थेत 'स्त्री' ही पुरुषांसारखीच बलवान होती. उत्तरोत्तर मानव समाजात राहून सामाजिक जीवन जगत असतांनाही स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीचे कार्य करतांना आपल्याला दिसून येते.पण जसजशी मानवाची प्रगती होत गेली,तसतशी स्त्रीला शारीरिक,मानसिक,भावनाप्रधान,लाचारी अशा अनेक कारणांनी दुर्बल बनविले गेले.‘चूल आणि मूल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र सीमित केले गेले.तिच्यावर एवढे दडपण आणले गेले की,पुरुषांच्या हाताखालचे आयुष्य हेच तिचे नैसर्गिक आयुष्य आहे असे तिलाही वाटू, भासू लागले.पण पुढे मानवाची प्रगती होत गेली.विज्ञानाचा शोध व स्त्रियांनाही शिक्षणाचा मिळालेला हक्क व अधिकार यातून स्त्रिया

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

शिकू - सवरू लागल्या,समजू लागल्या,पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून जवळपास सर्व क्षेत्रात कार्य करू लागल्या.म्हणून स्त्रियांच्या मनातील हुंकार ,वेदना,तडफड - कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष- कथा ,कादंबरी,काव्यलेखनाच्या माध्यमातून बाहेर पडून आपल्या न्याय हक्कासाठी विसाव्या शतकाच्या शेवटी स्त्रियांच्या छोट्या-छोट्या संघटनाच्या माध्यमातून विश्वव्यापी जोर धरू लागल्या.इथूनच पुढेहळूहळू स्त्रीवादाचा,स्त्रीवादी संघटनांचा जन्म होत गेला. या काळात बऱ्याच पुरुष कादंबरीकारांनीही साहित्य लेखन केले पण आपल्याला या ठिकाणी फक्त स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्याचाच विचार अपेक्षित आहे.

**उद्देश:**

१) स्त्रीवादी कादंबरीचा अभ्यास करणे.
२) स्त्रीवादी विचाराला वाव देणे.
३) स्त्रीवादी कादंबरीच्या बदलत्या स्वरूपाचे,विषयाचे विश्लेषण करणे.
४) स्त्रीवादी कादंबरीचे महत्त्व विशद करणे .
५) विज्ञानाचा, स्त्री शिक्षणाचा,महापुरुषांच्या जीवनाचा स्त्री विचारावर पडलेला प्रभाव विशद करणे.
६) स्त्रियांच्या बदलत्या कादंबरी लेखनाचे संवर्धन करणे.

**स्त्रीवाद:**

खरे तर स्त्रीवाद ही संकल्पना मुळात पाश्चात्त्य आहे असे डॉ.अश्विनी धोंगडे यांनी‘स्त्रीवादी समीक्षा: स्वरूप आणि उपयोजन’ या पुस्तकाद्वारे स्पष्ट केलेले आहे.त्यांच्या मते,जगाच्या इतिहासात ‘अमेरिकन स्त्री' ही आपले न्याय हक्क मिळविण्यासाठी लढू लागल्या व त्यात त्या यशस्वी झाल्या.“स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वतःचा सवता सुभा निर्माण करणे नव्हे, तर संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे.ज्यावेळी स्त्री ही खुलेपणाने श्वास घेऊन पुरुषांइतकेच स्वतंत्र जीवन जगू शकेल त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही.”[१]

**स्त्रीलिखित कादंबरीचे स्वरूप:**

या कालखंडातील जवळपास ६०० स्त्रीलिखित कादंबऱ्या आढळून येतात.आशा बगे, सानिया,गौरी देशपांडे,शांता गोखले,मेघना पेठे,कविता महाजन ह्या लेखिका तर इसवी सन २००० पूर्वीपासूनच लेखन करताना दिसून येतात. मेघना पेठे यांची 'नातीचरामी'(२००५),कविता महाजन यांची 'ब्र' (२००५) , ‘तन अंधारे'(२००९) अशा एक ना अनेक कादंबऱ्या.... “या सर्व कादंबऱ्यावर नजर टाकली तर ज्या कादंबऱ्यांमध्ये स्वातंत्र्योत्तर काळात बदललेल्या मराठी कादंबरीच्या खुणा आढळतात अशा कादंबऱ्या संख्येने पुष्कळच कमी आहेत. बहुतांश कादंबऱ्या स्वातंत्र्यपूर्व काळातील रंजक,लोकप्रिय मराठी कादंबरीशी नाते सांगणाऱ्या अशा आहेत.वाचकांचे कुतूहल जागृत करणारी सुरुवात,उत्कंठावर्धक पद्धतीने केलेले घटनांचे निवेदन,अनपेक्षित आणि वाचकांचे समाधान करणारा शेवट असे रंजकतीचे तंत्र या कादंबऱ्यांमध्ये आढळते”[२]

**२००१-२०१० च्या दशकातील स्त्री- लिखित कादंबरीचे वेगळेपण :**

२१ व्या शतकाच्या पहिल्या दशकातील ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्या अगदी पारंपरिक विषयापेक्षा नवनवीन, वेगवेगळ्या विषयावरील आढळून येतात.

'राहूकेतू' ही मधु सावंत यांची या कालखंडाच्या अगदी सीमारेषेवरील कादंबरी आहे.यात स्थानिक स्वराज्य संस्थात तीस टक्के आरक्षणामुळे जिल्हा परिषदेवर महिलांचा सहभाग आणि राजकारण करत असतांना नायिका वेनुताई कदम यांना तेथील राज्यव्यवस्था पूर्ण क्षमता असूनही ती फक्त स्त्री आहे, म्हणून कामात अडथळे आणले जातात.ओळखीच्या व्यक्तीदेखील सहकार्य करत नाहीत,अशाही विपरीत परिस्थितीत नायिका आपला आशावाद टिकवून ठेवते व भ्रष्ट राजकारणात खऱ्या सत्यवादी स्त्रीची हतबलता लेखिका साकार करते.

'वल्लरी' (२००३) या कादंबरीत अरुणा लोणंदकर यांनी जानवी व गोपाळराव यांच्या 'वल्लरी' नावाच्या एका तृतीयपंथीची कहाणी सांगितली आहे.बाळंतपण करणारी सूईन हिला खूप उशिरा लक्षात आल्यावर ती त्याला 'छक्का' संबोधते तेव्हा या कादंबरीचे स्वरूपच बदलते. व 'वल्लरी''ना धड स्त्री ना धडपुरुष' पण ती अतिशय सुंदर असल्याने मुंबई- पुणे प्रवासादरम्यान तिच्यावर झालेला बलात्काराचा प्रसंग.त्यात तिच्या सौंदर्याचा झालेला अपमान व उपहास झाल्याने तिने स्वतःच्या जीवनाचा केलेला अंत.याद्वारे लेखिकेने तृतीयपंथीयाचे जीवन व त्यांच्या जीवनात निर्माण होणारे कटू प्रश्न,त्यांचे सामाजिक पैलू,कुटुंबाचा आधार न मिळणे,वेगळी तुच्छ,हीन वागणूक यांचे वेगवेगळे पैलू लेखिकेने साकार केले आहेत.

मराठी साहित्यात वेश्याव्यवसाय, वेश्याजीवन यावर कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.पण,'शोध' ही नीलम माणगावे यांची कादंबरी वेश्यांच्या वेगळयाच जीवनपद्धतीवर बोट ठेवते.कादंबरीतील नायिका'कविता'हीची आज माहेरची बाल मैत्रीण 'गुलाबी'हिच्याशी वेश्यावस्तीत कवितासोबत भेट होते तेव्हा असे कळते की,गुलाबीला तिच्याच आईने एका व्यक्तीला विकले.त्यामुळे गुलाबीला कुमारवयातच हा व्यवसाय स्वीकारावा लागला.वेश्याव्यवसाय सोडल्यानंतरही लग्न न जुळू शकल्याने परिणामी तिला परत वेश्याव्यवसायच स्वीकारावा लागला.पण आपल्या मुलीला तरी वेगळे जीवन मिळावे हा गुलाबीचा साधा व सरळ विचार पण,वेश्येची मुलगी म्हणजे सार्वजनिक मालमत्ता असा समाजाचा होऊन बसलेला विकृत दृष्टिकोन.त्यामुळे गुलाबीची मुलगी शराबी हिलासुद्धा आईचाच वेश्याव्यवसायाचा मार्ग निवडावा लागतो.त्यातून तिला एड्स होतो.व शेवटी दोघींनीही केलेली आत्महत्या.यामुळे ही कादंबरी एका व्यक्तीची असली तरी सर्व समाजाच्या एकेकास्तराचे चित्रण करते.वेश्याविषयी नुसते प्रेम,सहानुभूती,सदिच्छा दाखवण्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर योजनापूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहेअसे ही कादंबरी सुचवते.

छाया महाजन यांच्या 'कॉलेज'(२००६) या कादंबरीत आजच्या मोठ्या शिक्षण संस्थातील शैक्षणिक वातावरण आणि शिक्षण संस्कृतीवरील ही कादंबरी आहे.यात स्त्रियांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन,आपल्याला कायमस्वरूपी काम मिळावे याकरिता तात्पुरत्या व तासिका तत्वावर काम करणाऱ्या लोकांची धडपड,सहानुभूती निर्माण करीत व स्त्रीत्वाचा वापर करीत स्वतःचा स्वार्थ साधून घेणाऱ्या प्राध्यापिका. यामुळे ढासळत चाललेला शिक्षणाचा दर्जा व बौद्धिक विश्व लेखिकेने साकार केले आहे.

'फाशीचा साक्षीदार' ही 'ज्योती पुजारी' यांची कादंबरी ही 'सखाराम' नावाच्या फाशी देण्याचे काम करणाऱ्या जल्लादाच्या जीवनावर आहे. तो अनिच्छेने हे काम स्वीकारतो. त्यामुळे सखारामच्या मनावर व कुटुंब जीवनावर कसा खोलवर परिणाम होतो ते सांगितले आहे.पण जर काम सोडले तर नोकरी जाण्याचे भय.हळूहळू सवयीने सखारामच्या मनातील भय कमी होते.तो प्रेतांबरोबर तळघरात झोपीसुद्धा जातोहे याचे धोतक ठरते.अशा वेगळ्या विषयांवरील ही कादंबरी आहे.

प्रतिमा इंगोले यांच्या 'पार्ट टाईम'(२००२),'बोडखे'(२००६), 'आत्मघाताचे दशक' या कादंबऱ्या आहेत.यापैकी 'आत्मघाताचे दशक' ही त्यांची समकालीन शोषणाच्या एकूण आत्महत्याचे वर्णन व संदर्भ देणारा तक्ता आहे.

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

**स्त्रीकेंद्री कादंबऱ्यातील स्त्री प्रतिमा:**

या काळात गौरी देशपांडे यांनी 'गोफ' आणि 'उत्खनन' या कादंबऱ्या लिहिल्या.त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून वेगळ्या स्त्री प्रतिमा घडवण्याचा प्रयत्न केला.'गोफ'या कादंबरीत त्यांनी स्त्रियांमधील भगिनीभावाचे संबंध स्पष्ट केले.तर 'उत्खनन' या कादंबरीत त्यांनी विवाहपूर्व मातृत्वाचा गंभीर प्रश्न हाताळला आहे.सानिया यांची 'स्थलांतर'(२००२) ही कादंबरी 'जगदीश' आणि 'नंदिता' यांच्या उदात्त नात्यांची झालर चित्रीत करते.ही कादंबरी 'प्रेम' या भावनेचा उदात्त अनुभव सांगते.आशा बघे यांची 'सेतू'(२०००) व 'भूमी'(२००४) ह्या कादंबऱ्या आहेत.यात उच्च स्तरातील पारंपरिक पद्धतीच्या कुटुंबाचे अनुभव,त्यातील परस्पर नातेसंबंधातील गुंतागुंत हे आशा बघे यांच्या कादंबरीचे वैशिष्ट्य ठरते.भूमी कादंबरीतील नायिका'मैथिली' ही परावलंबी अवस्थेतही परिस्थिती प्रतिकूल असतानाही आपला स्वाभिमान सोडत नाही.व आपले स्वत्व टिकविण्यासाठी सारखी कशी धडपडते हे स्पष्ट करते."आशा बगे यांच्या 'भूमी' या कादंबरीला (२००६) चा 'साहित्य अकादमी' चा पुरस्कार मिळाला आहे."[३]

छाया महाजन यांची 'मानसी' ही कादंबरी आधुनिक जीवनाचे चित्रण करणारी स्त्री लिखित,स्त्रीकेंद्री कादंबरी आहे.तीप्रौढ असणाऱ्या त्रिलोकसिंग उद्योगपतीच्या आंधळ्या प्रेमात बुडालेली असते.मानसीचा अपघात झाल्यावर तिला त्रिलोकसिंगचे खरे रूप कळते.मानसीच्या बहिणीच्या घराशेजारीच राहणाऱ्या कुटुंबातही असेच विवाहित जोडपे राहत असते.अशा नातेसंबंधाकडे समाज कोणत्या दृष्टिकोनातून पाहत असेल असे मानसीला वाटतेव ती भानावर येते,स्वतःला सावरते.याद्वारे विवाहबाह्य प्रेम संबंधात होणारी मानसीची फसवणूक इथे लेखिकेने सांगितली आहे.

**राजकीय जीवनावरील कादंबऱ्या:**

'हुतात्मा' ही मीना देशपांडे यांची कादंबरी होय.यात लेखिकेने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे,महत्त्वाच्या घडामोडीचे, टप्प्यांचे,बदलांचे तपशीलवार चित्रण केले आहे.म्हणून ही कादंबरी या काळातील राजकीय क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कादंबरी ठरते.यात सुरुवातीला छोटी असलेली महाराष्ट्र चळवळ पुढे कशीफ़ोफावत,विशाल होत गेली. पुढे या चळवळीचे सूत्रे सामान्य माणसांच्या हातात येऊन नंतर सामान्य माणसांचाच बळीकसा जातो.याचे वर्तमानपत्रातील मजकुराचा आधार घेऊन वर्णन केले आहे.महाराष्ट्राच्या लढ्याचे,सत्याग्रहाचे, गोळीबाराचे,जनतेच्या उत्स्फूर्त उत्साहाचे आणि असंतोषाचे प्रत्ययकारीचित्रण हे 'हुतात्मा' कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

**सामाजिक जीवनावरील कादंबऱ्या:**

मराठी भाषेत एक वेगळे पण तितक्याच दुर्लक्षित लेखिका मल्लिका अमर शेख यांनी 'हँडल विथ केअर' (२००७)ही कादंबरी छोटीशी पण सर्व दृष्टीने आपले वेगळेपण सिद्ध करणारी कादंबरी लिहिली. ही कादंबरी लिहिली त्या 'शाहीर अमर शेख' यांची मुलगी असून मराठीतील ज्येष्ठ कथाकार 'नामदेव ढसाळ' यांच्या पत्नी आहेत.पण त्यांनी आपल्या लेखनाने स्वतःचे नाव, अस्तित्व निर्माण केले.'हँडल विथ केअर' या कादंबरीत नायक 'अतुल' नावाच्या सर्वसामान्य माणसाची कहाणी आहे.त्याला त्याचे आयुष्य निरस बेचव वाटते.जीवन जगताना मात्र त्याला कधी पैशाची,तर कधी स्त्रीमोहाच्याप्रलोभनाचे अनेकक्षण येतात.पण तो आपली सद्सद् विवेकबुद्धी वापरून स्वतःवर अंकुश ठेवण्यात यशस्वी होतो.मुंबईच्या धावपळीच्या जीवनावरील ही कादंबरी एका स्त्रीने लिहिलेली असूनही निवेदन मात्र पुरुषमुखी,प्रथमपुरुषी व एकवचनी आढळते.यातील 'अतुल' हा सर्वसामान्य असूनही,सर्व माणूस जातीचे प्रतिनिधित्व करताना दिसतो.

सानिया या स्त्रीवादी लेखिकेने 'अवकाश'(२००१) या कादंबरीद्वारें स्त्रीच्या मनातील खोल विचार शोधण्याचा प्रयत्न केला आहे.कादंबरीची नायिका 'जानवी' ही मुलगी खूप हुशार,कविता करणारी आणि डॉक्टर होण्याचे स्वप्न बघणारी एक सुंदर चुनचुनित,चिंतनशील मताची मुलगी आहे.तीजीवनात पडलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतः संशोधक वृत्तीने शोधण्याचा प्रयत्न करते.जरीलवकर लग्न करून मोकळे व्हावे असे आईला वाटत असले तरी वडील व भाऊ मात्र तिला उच्च शिक्षणासाठी साथ देतात.पण अनपेक्षित,अचानकपणेमोठा भाऊ समुद्रात बुडून मरण पावल्यावर तिच्या स्वप्नांची राखरांगोळी होऊन संपूर्ण कुटुंबाची वाताहत होते. पुढे 'जानवी' चे आयुष्य नदीच्या प्रवाहात सापडल्यासारखे जिकडे पाणी जाईल तिकडे तिला वाहत, समरस होत जीवन जगावे लागते.

अंजली सोमन यांची 'खोल - खोल डोहाच्या तळाशी'(२००५) ही सामाजिक कादंबरी आहे.कादंबरीची नायिका 'प्रज्ञा' हिची आई बुद्धिमान,कर्तृत्ववान असल्याने गुरुकुल नावाची शाळा स्थापन केल्याने तिचा नावलौकिक असतो.पण प्रज्ञाला आईची 'एक डायरीतील चिठ्ठी व बकुळीचे फुल' सापडल्याने तिला शंका येते.पण पुढे आई व आजीने किती कष्ट सोसले हेच त्यातून निष्पन्न होतांना दिसते.

शुभांगी भडभडे यांची'कृष्णसखा'(२००२) ही सामाजिक विषयावर लिहिलेली कादंबरी आहे.यामध्ये तत्कालीन काळात अवयवतस्करी करणारा 'डॉक्टर' हा नायक आहे.तो मानवी किडनीची स्मगलिंग करतो.याविषयी डॉक्टरची पत्नी 'चारुता' अनभिज्ञ असते.पण जेव्हा तिला हे सर्व समजते तेव्हा ती पेटून उठते.व एक कर्तव्यानिष्ठ,जबाबदार नागरिक म्हणून पतीला पोलिसांच्या स्वाधीन करते.

ललिता गंडभीर यांची 'दहशतवादाची कथा'(२००३) ही कादंबरी सुडाच्या भावनेतून दहशतवादावर लिहिलेली,लाहोर जवळील गावातील,तीन पिढ्याच्या एका कुटुंबाची सामाजिक कथा आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सभाने यांची 'मुन्नी'(२०१०) ही कादंबरी एका वेश्या स्त्रीच्या जीवनावर आधारित आहे.“पुरुषी वासनांच्या शिकारहोणाऱ्या,फसवल्या जाणाऱ्या,नवऱ्याने टाकून दिलेल्या,मुलींचे रस्ते शेवटी वेश्या वस्तीला जाऊन मिळतात.आणि त्यांचे आयुष्य रसातळाला जाते.पण मुन्नीचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न यशस्वी होतो आणि तिचे आयुष्य भेसूर होत जाते. समाजात अशा किती स्त्रिया फसवल्या जात असतील आणि त्यांच्या आयुष्याची माती होत असेल हा विचार अस्वस्थ करणारा आहे”[४]

**ऐतिहासिक कादंबऱ्या:**

प्रमिला जरग यांनी 'आदीपर्व'(२०१०) नावाची 'मालोजीराजे भोसले' यांच्या जीवनावरील ऐतिहासिक कादंबरी लिहिली.या कादंबरीत मालोजीराजे भोसले यांच्या काळचा इतिहास वर्णन असल्याने ही कादंबरी ऐतिहासिक, तर यात मालोजी राजे यांचे चरित्रही आल्याने चरित्रात्मक कादंबरीसुद्धा ठरते.लेखिकेने या कादंबरीत तत्कालीन सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी एका चित्र फलकासारखी उभी केली आहे.

ज्योत्स्ना देवधर यांनी 'उषा नगरी'(२००९) नावाची 'अरविंदबाबू' यांच्या 'पांडिचेरी' येथील आश्रमावर आधारित ऐतिहासिक कादंबरी लिहिली आहे.

माधवी देसाई यांनी 'परिवर्तन'(२००७) नावाची'गोवा' राज्याच्या झपाट्याने बदलत चाललेल्या समाज जीवनावरील कादंबरी लिहिलेली आहे.यात गोव्याचे स्वातंत्र्य लढ्याच्या आधीचे जीवन व स्वातंत्र्योत्तर काळातील जीवनपद्धती ही ऐतिहासिक भाग घेऊन कादंबरी पूर्ण केली.

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

**वैशिष्ट्ये:**

१) पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियासुद्धा कादंबरी लेखनात आपला ठसा उमटवत आहेत.
२) पूर्वीपेक्षा आत्ताच्या स्त्रीवादी कादंबऱ्यात पारंपरिक विषयापेक्षा नव-नवे विचार मांडल्याचे दिसून येते.
३) स्त्रीवादी विचारानेच,स्त्रियांना हाताशी धरूनच समाजाची सर्वसमावेशक प्रगती होऊ शकते.
४) स्त्रीवादी साहित्यातून स्त्रियांची मने मोकळी होताना दिसून येतात.

**निष्कर्ष:**

१) एकविसाव्या शतकातील स्त्री स्वबळावर साहित्यलेखनात पुढे येताना दिसून येते.
२) साहित्यलेखन करताना स्त्री- पुरुषाला बरोबरीचे किंवा उच्च स्थान देते,पण कुठेही पुरुषाला डावलत नाही किंवा कनिष्ठ,कमजोर लेखत नाही.
३) नवनवे विषय हाताळत स्त्रिया आपल्या कादंबरी लेखनात यशस्वी झालेल्या दिसून येतात.
४) स्त्रीवादी साहित्याला वाव दिल्यास ते एक अव्वल दर्जाचे साहित्य ठरू शकते.

**संदर्भग्रंथ सूची :**

१)अश्विनी धोंगडे,'स्त्रीवादी समीक्षा: स्वरूप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन,पुणे,तृ.आ. २००९,पृ.क्र.६

२)संपा. डॉ. मंदा खांडगे,'संत साहित्याचा मागोवा,' खंड ४.इ.स. २००१-२०१०,साहित्यप्रेमी भगिनी मंडळ,

पुणे प्र.आ. २०१५ पृ.क्र. ६१

३)तत्रैव,३पृ.क्र. ७१

४)तत्रैव,४पृ.क्र. ८५

––––––